मिसेस प्लग - द प्लंबर

ॲलन अल्बर्ग व जो राईट


अनुवाद : सुजाता गोडबोले



मिसेस प्लग - द प्लंबर

ऍलन अल्बर्ग व जो राईट
अनुवाद : सुजाता गोडबोले





गावात कोणालाही प्लंबरची गरज पडली,

तर लोक म्हणत, “श्रीमती प्लगना बोलवा!”



श्रीमती प्लगना बोलावले की त्या यायच्या.

श्रीयुत प्लगही यायचे.

ते त्यांचे मदतनीस होते.

सोबत त्यांची दोन लहान मुले देखील यायची.

श्रीमती प्लगची एक कामाची


पिशवी होती.






त्यात एक करवत, एका हातोडी,


एक पाना, पकड,






एक पैशाचे पाकीट, कंगवा, एक लिपस्टिक,

तुंबलेल्या नळातील गाळ ढकलण्यासाठी एक दट्ट्या,







जोडण्याचे काम करणारा एक पंप (ब्लो टॉर्च)

आणि अशाच इतर काही गोष्टी असत.




एकदा काय झालं,

एका बाईंच्या न्हाणीघरातल्या नळात रात्री बिघाड झाला

तो दुरुस्त करण्यासाठी एका प्लंबरची गरज होती.

शेजारी म्हणाले,

“श्रीमती   प्लगना बोलवा.”



जेव्हा श्रीमती प्लगना बोलावले,

तेव्हा त्या आल्या.

पण श्रीयुत प्लग काही आले नाहीत.

कारण त्यांना घरी मुलांना झोपवायचं होतं.

श्रीमती प्लग आल्याबरोबर कामाला लागल्या.

काम पूर्ण झाल्यावर घरातल्या बाईंनी त्यांना चहा दिला आणि कामाचे पैसेही दिले.

मग श्रीमती प्लग आपल्या घरी निघाल्या.





पण वाटेत एक भयंकर गोष्ट घडली.

श्रीमती प्लगना एक चोर दिसला.



रस्त्यात तो एका श्रीमंत माणसाला
अडवून चोरी करत होता.
चोराला श्रीमती प्लग दिसल्या.
त्याला त्यांच्याही वस्तू चोरायचा होत्या.

“पिशवीत काय आहे?” त्याने विचारले.

“एक कंगवा आहे,” श्रीमती प्लगनी उत्तर दिले.

“तो आण इकडे,” चोर म्हणाला.

“आणि एक लिपस्टिक पण आहे,” श्रीमती प्लग म्हणाल्या.

“ते पण मला दे.” चोर म्हणाला.

“आणि... एक जोडणी करायचा टॉर्च!” श्रीमती प्लग म्हणाल्या.




टॉर्च हातात धरून श्रीमती प्लग चोराच्या मागे धावू लागल्या.

टॉर्चने चोराचा पृष्ठभाग चांगला भाजून निघाला.

“ओय! ओय!” चोर ओरडू लागला

आणि पळून गेला.


हे पण घे!
वाचवा!



“तुमची पिशवी फारच उपयोगी आहे,”

श्रीमंत माणूस म्हणाला.

त्याने श्रीमती प्लगचे आभार मानले

आणि त्यांना एक बक्षीस दिले.

ती जगाच्या प्रवासाची चार तिकिटे होती.

“मी आणि माझी बायको मुलांना घेऊन

प्रवासाला जाणार होतो” तो म्हणाला.

“पण आता आम्ही पुढच्या आठवड्यात जाऊ.”

श्रीमती प्लग घरी गेल्या.

चोराची आणि श्रीमंत माणसाची हकीकत

त्यांनी श्रीयुत प्लगना सांगितली

आणि त्यांना मिळालेले बक्षिसही दाखवले.

“तू फारच धीराने वागलीस” श्रीयुत प्लग म्हणाले

त्यांनी आपल्या बायकोला चहा करून दिला

आणि तिचे कौतुकही केले.




दुसऱ्या दिवशी प्लग कुटुंबाने जगाच्या प्रवासाला निघण्याची तयारी केली.

त्यांनी आपले सामान बांधले.

परत येईपर्यंत सांभाळण्यासाठी आपले मांजर एका शेजाऱ्यांकडे दिले.

दुधवाल्याला निरोप दिला.



मग ते निघाले.

श्रीयुत प्लगनी सामान आणि मुले घेतली.

श्रीमती प्लगनी आपली नेहमीची कामाची पिशवी बरोबर घेतली.

प्रवास सुरु झाला.

प्लग कुटुंबाचा वेळ मजेत चालला होता.

उत्तरेकडील समुद्रात त्यांनी मोठाले बर्फाचे डोंगर पहिले.

दक्षिणेकडील समुद्रात त्यांना उडणारे मासे दिसले.

कॅप्टनच्या सोबत त्यांनी मेजवानीचा आनंद घेतला.

आकाशात तारे चमचमत असताना


त्यांनी डेकवर मनसोक्त नृत्य केले.





एका रात्री समुद्रात

एक भयंकर वादळ झाले.



त्यांचे जहाज एका खडकावर आपटले.

जहाजाच्या एका बाजूला एक भोक पडले.

त्यातून पाणी आत येऊ लागले.



“वाचवा! वाचवा!” लोक घाबरून ओरडू लागले.

झोपायच्या कपड्यातच ते इकडे तिकडे पळू लागले.

“आता आम्ही बुडून जाऊ!”

जहाजाच्या कॅप्टनने भोकाची पाहणी केली.

“आपल्याला आता एका प्लंबरची गरज आहे,” कॅप्टनने जाहीर केले.

“श्रीमती प्लगना बोलवा!” कोणीतरी म्हणाले.

मग श्रीमती प्लगना बोलावल्यावर त्या आल्या.

त्यांच्या मागोमाग श्रीयुत प्लग आणि मुलेही आली.

आणि अर्थातच त्यांची कामाची पिशवीही आली.


श्रीमती प्लगना बोलवा!

श्रीमती प्लग लगेच कामाला लागल्या.

त्यांनी पाना आणि हातोडी काढली.


पकडीचा वापर केला.

जोडणी करण्याच्या टॉर्चचा देखील उपयोग झाला.

श्रीयुत प्लगनी त्यांना मदत केली.

दोघेही भिजून चिंब झाले.

पण जहाजाचे भोक दुरुस्त झाले.





“प्लंबर आणि त्याच्या मदतनिसाचा विजय असो!”

कॅप्टन म्हणाला.

“प्लंबरच्या मुलांचा विजय असो!”

“प्लंबरच्या कामाच्या पिशवीचा विजय असो!”



दुसऱ्या दिवशी हा आनंद साजरा करण्यासाठी
मोठी मेजवानी झाली.
प्लग कुटुंबियांना कॅप्टन सोबत जेवायला
बसवण्यात आले.
श्रीमती प्लग आणि श्रीयुत प्लग यांनी
जहाजाच्या डेकवर चांदण्यात नृत्य केले.



त्यांची मुले कॅप्टनच्या मांडीवर बसून
मजा पाहत होती.
कॅप्टनच्या सोन्याच्या घड्याळाशी
आणि त्याच्या दाढीशी ती खेळू लागली.



अचानक कॅप्टनला त्याच्या मांडीवर
काही तरी ओले लागले.
त्याने मांडीवरच्या मुलांकडे पहिले.
“मला वाटते, तुमच्यापैकी कोणाला तरी
प्लंबरची गरज आहे” कॅप्टन म्हणाला.
“श्रीमती प्लगना बोलवा!”

अंत